आकाशवाणी नागपूर,

प्रादेशिक वृत्त विभाग

प्रादेशिक बातम्या (मराठी-वेळ सायंकाळी ०६.००)

बुधवार दिनांक २ एप्रिल २०२५

ठळक बातम्या

1. वक्फ सुधारणा विधेयक लोकसभेत सादर, धार्मिक स्थळाच्या नियमांत बदल किंवा हस्तक्षेप करण्याचा उद्देश नसल्याचं सरकारचं स्पष्टीकरण.
2. देशभरातल्या राष्ट्रीय महामार्गावरच्या टोलमध्ये ४ ते ५ टक्क्यांची वाढ.
3. बुलढाणा जिल्ह्यात झालेल्या अपघातात ६ जण ठार तर २६ जण जखमी.
4. विदर्भातील नागपूर वर्धा तसेच यवतमाळ जिल्ह्याकरिता करिता हवामान खात्याचा पर्जन्यवृष्टीचा ऑरेंज अलर्ट जारी.

---------------------------------------------

वक्फ सुधारणा विधेयक

केंद्रीय अल्पसंख्याक व्यवहारमंत्री किरेन रिजिजू यांनी आज लोकसभेत वक्फ सुधारणा विधेयक सादर केलं. या विधेयकाचं उद्दिष्ट वक्फ मालमत्तेचं व्यवस्थापन आणि प्रशासन यात सुधारणा करणं हे आहे. हे विधेयक केवळ मालमत्ता व्यवस्थापनाशी निगडित असून सरकार कोणत्याही धार्मिक स्थळाच्या नियमांत बदल किंवा हस्तक्षेप करणार नाही, असं ते म्हणाले.

*(वक्फ बोर्ड का प्रावधान किसी मस्जिद, किसी मंदिर, किसी धार्मिक स्थल का व्यवस्था का कोई लेना देना नहीं है। ये सिम्पली एक प्रॉपर्टी का मॅनेजमेंट का विषय है। ये कोई मुसलमान अपना जकात देता है,फिदा देता है उसको हम पूछने वाला कौन होते है? ये आपका धार्मिक भावना से जुड़े हुए चीज़ है। उसमें सरकार का कोई लेना देना नहीं है। लेकिन ये वक्फ प्रॉपर्टी का मामला है लेकिन वक्त प्रॉपर्टी का मैनेजमेंट करता है। मुतावलीज् करता है ये आपको आपको इतना बेसिक ये फर्क जो है अगर समझ में नहीं आते या जानबूझकर के आप नहीं समझना चाहते हैं तो मेरे पास इसका कोई इलाज नहीं है।)*

वक्फ सुधारणा विधेयकावर विचारविनिमय करण्यासाठी स्थापन केलेल्या संयुक्त संसदीय समितीत यावर व्यापक चर्चा झाली आहे, आतापर्यंत कोणत्याही विधेयकावर इतकी चर्चा झालेली नाही, असं रिजिजू म्हणाले. विधेयकाला विरोध करणारे देखील त्यातल्या सुधारणांचा अभ्यास केल्यानंतर त्याचं स्वागत करतील, मात्र विरोधक याबाबतीत जनतेची दिशाभूल करत आहेत, असा आरोप त्यांनी केला. वक्फ बोर्डांमध्ये शिया, सुन्नी, बोहरा तसंच मुस्लिम समाजातल्या मागास जमातींचे प्रतिनिधी आणि महिलांचा देखील समावेश असेल अशी माहिती रिजिजू यांनी दिली. सरकार कोणाच्याही धार्मिक भावना दुखावत नसल्याचं ते म्हणाले.संपूर्ण जगातल्या वक्फ मालमत्तेपैकी सर्वाधिक मालमत्ता भारतातल्या वक्फ मंडळांच्या ताब्यात आहे, मात्र असं असूनही आजपर्यंत मुस्लिम समाजातले गरीब लोक शिक्षण, वैद्यकीय सुविधा, रोजगार यांपासून का वंचित राहिले, असा प्रश्न त्यांनी व्यक्त केला. या विधेयकाला धर्म आणि जातीच्या कक्षेतून न पाहता त्याकडे मुस्लिम समाजातल्या गरिबांच्या कल्याणाच्या दृष्टीनं बघावं, असं आवाहन त्यांनी केलं. आपल्या देशात कित्येक वक्फ मालमत्ता पडून आहेत, त्यांचा उपयोग गरीब मुस्लिमांसाठी करता येईल, असं ते म्हणाले.केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांनीही लोकसभेत विरोधकांच्या प्रश्नांना उत्तर दिलं. केंद्रीय मंत्रिमंडळानं वक्फ सुधारणा विधेयक संमत केल्यानंतर ते संसदेसमोर मांडण्यात आलं होतं त्यानंतर सभागृहाच्या सहमतीनंच ते संयुक्त संसदीय समितीकडे पाठवण्यात आलं होतं. विरोधी पक्षांचा देखील तसाच आग्रह होता, असं त्यांनी स्पष्ट केलं. केंद्रीय मंत्रिमंडळानं वक्फ सुधारणा विधेयक संमत केल्यानंतर ते संसदेसमोर मांडण्यात आलं आणि सभागृहाच्या सहमतीनंच ते संयुक्त संसदीय समितीकडे पाठवण्यात आलं होतं. विरोधी पक्षांचा देखील तसाच आग्रह होता, असं केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांनी आज लोकसभेत सांगितलं. विरोधी पक्षांनी उपस्थित केलेल्या प्रश्नांना ते उत्तर देत होते. समितीनं विधेयकात सुचवलेल्या सुधारणांसह केंद्रीय मंत्रिमंडळानं त्याला सहमती दिली असं ते म्हणाले. तर कोणत्याही विधेयकात सुधारणा करण्याचा समितीला संपूर्ण अधिकार असतो असं लोकसभेचे अध्यक्ष ओम बिर्ला यांनी सांगितलं.

---------------------------------------------

वक्फ सुधारणा विधेयक-टिका

वक्फ सुधारणा विधेयक संविधान विरोधी असून, सरकार त्यावरून जनतेची दिशाभूल करत असल्याचा आरोप, काँग्रेसचे गौरव गोगोई यांनी, लोकसभेत यावरच्या चर्चेला सुरुवात करताना केला. हे विधेयक आणून, सरकारचा संविधानाला कमकुवत

करण्याचा, अल्पसंख्यक समाजाला बदनाम करण्याचा आणि भारतीय समाजात, दुफळी माजवण्याचा डाव आहे, अशी टीका त्यांनी केली.या विधेयकातल्या सुधारणांमुळे, आणखी समस्या निर्माण होतील असं, ते म्हणाले.

----------------------------------------------

अंमली पदार्थ जप्त

भारतीय नौदलाच्या, आय.एन.एस. तर्कश या लढाऊ जहाजानं, पश्चिम हिंद महासागरात, अडीच हजार किलो अंमली पदार्थ जप्त केले. पश्चिम हिंद महासागरात, एक जहाज संशयास्पदरित्या आढळल्याची माहिती, भारतीय नौदलाच्या, पी-८-आय, विमानानं आय.एन.एस. तर्कशला दिली होती.हे जहाज अमली पदार्थ वाहून नेत असल्याचा संशय होता. त्यामुळे आय.एन.एस. तर्कशनं आपला मार्ग संशयित जहाजाच्या दिशेने बदलला. या जहाजाची चौकशी करून ते अडवण्यात आलं. जहाजाची तपासणी केल्यानंतर त्यात अमली पदार्थ सापडले.

----------------------------------------------

टोल शुल्क वाढ

राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणानं, देशभरातल्या टोलशुल्कात, ४ ते ५ टक्क्यांनी वाढ केली असून, ही वाढ तात्काळ लागू होणार आहे. हलक्या वाहनांसाठी ५ ते १० रुपये तर जड वाहनांसाठी, २० ते २५ रुपयांनी टोल वाढणार आहे.कारसाठीचा मासिक पास आता ९३० वरून ९५० रुपये इतका होणार आहे. हे सुधारित दर, देशभरातले राष्ट्रीय महामार्ग तसंच एक्सप्रेस मार्गांना लागू होणार आहेत.

----------------------------------------------

अपघात

बुलढाणा जिल्ह्यात, खामगाव शहरालगतच्या, शेगाव मार्गावर आज पहाटे तीन वाहनं एकमेकांवर आदळल्यानं झालेल्या अपघातात, ६ जण जागीच ठार तर २६ जण जखमी झालेत.खासगी बसला ओव्हरटेक करणाऱ्या बोलेरो कारला समोरून एसटी बस आणि मागून खासगी बसची धडक बसल्यानं हा अपघात घडला. यात बोलेरोमधल्या ५ आणि एसटी मधल्या एका प्रवाश्याचा मृत्यू झाला. जखमींवर खामगावच्या सामान्य रुग्णालयात उपचार सुरु आहेत.

----------------------------------------------

हवामान

प्रादेशिक हवामान विभाग नागपूर यांच्या अंदाजानुसार, पुढील काही तासात नागपूर आणी वर्धा जिल्ह्याच्या तुरळक ठिकाणी विजांच्या कडकडाटासह, हलका ते मध्यम पाऊस पडण्याची शक्यता असून, हवामान खात्यानं या दोन जिल्ह्याकरीता तसंच

यवतमाळकरिता आज, ऑरेंज अलर्ट घोषित केला आहे.तर पुर्ण विदर्भात पुढील दोन दिवस हलक्या ते मध्यम पावसाचा यलो अलर्ट जारी केला आहे.दरम्यान आज दुपारपासून, नागपूर शहरात पावसाची भुरभुर सुर असून, अकोल्यातही, पहाटेपासून ठिकाणी रिमझिम पाऊस पडत आहे. विदर्भात सर्वात जास्त तापमान चंद्रपूर इथं 38 अंश सेल्सिअस नोंदवण्यात आलं.

--------------------------------------------

आदीवासी भवन

गोंदियामध्ये वीरांगना राणी दुर्गावती, आदिवासी सेवा समितीच्या वतीनं आयोजित कार्यक्रमात, क्रांतिकारी शहीद बाबूरावजी शेडमाके यांची जयंती साजरी करण्यात आली. या विशेष प्रसंगी, गोंदिया विधानसभा क्षेत्राचे आमदार, विनोद अग्रवाल यांनी, शहीद बाबूरावजी शेडमाके यांच्या प्रतिमेला, पुष्पांजली अर्पण करून श्रद्धांजली वाहिली.गोंदिया शहरात आदिवासी समाजासाठी स्वतःचे कोणतेही स्थायी स्थळ नव्हते, जिथे ते आपले कार्यक्रम आयोजित करू शकतील. अनेक वर्षांपासून हा समाज तात्पुरते मंडप लावून कार्यक्रम करत होता. मात्र, आता या समस्येवर कायमस्वरूपी तोडगा काढण्यात आला आहे.आम्ही आदिवासी समाजासाठी एक भव्य आणि समर्पित भवन उभारणार आहोत, ज्याची किंमत पाच कोटी रुपये असेल. या भवनामध्ये आदिवासी समाजाच्या सर्व कार्यक्रमांसाठी आवश्यक सोयी-सुविधा उपलब्ध करून दिल्या जातील, अशी घोषणा आमदार विनोद अग्रवाल यांनी याप्रसंगी केली.

--------------------------------------------

सहयोग बैठक

प्रादेशिक सेंद्रिय आणि नैसर्गिक शेती, गौ-विज्ञान केंद्र, नागपूर रिसर्च सेंटर आणि देवलापार यांच्या दरम्यान, एक महत्त्वाची सहकार्य बैठक आयोजित करण्यात आली. या बैठकीत, सेंद्रिय आणि नैसर्गिक शेतीला प्रोत्साहन देण्याबाबत, चर्चा करण्यात आली. नाविन्यपूर्ण संशोधन, स्वदेशी गायीवर आधारित शेती प्रणाली, आणि शाश्वतता देणे अशा शेती पद्धतींवर चर्चा झाली.तज्ञांनी म्हटलं की पर्यावरणपूरक आणि फायदेशीर कृषी तंत्रांचा प्रचार करणे आणि त्याबाबत विचार विमर्श करण्यासाठी, दोन्ही संघटनां मधील मुद्द्यांवर चर्चा करणे आणि सहकार्य मजबूत करण्यासोबतच, कृषी क्षेत्रात, सकारात्मक राष्ट्रीय बदल घडवून आणणे हा, या बैठकीचा मुख्य उद्देश होता.

--------------------------------------------

क्रिकेट

आयपीएल क्रिकेट स्पर्धेत रॉयल चॅलेंजर्स बेंगळुरूचा सामना आज गुजरात टायटन्सशी होणार आहे. हा सामना बेंगळुरूच्या एम. चिन्नास्वामी स्टेडियमवर संध्याकाळी ७.३० वाजता सुरू होईल. काल रात्री लखनौ इथं झालेल्या सामन्यात पंजाब किंग्सनं लखनौ सुपर जायंट्स संघाचा ८ गडी राखून पराभव केला. लखनौ सुपर जायंट्स संघानं निर्धारित २० शतकात ७ गडी गमावून १७१ धावा केल्या.पंजाब किंग्सनं अवघ्या २ गड्यांच्या मोबदल्यात १६ षटकं आणि २ चेंडुंत हे आव्हान पार केलं. गुणतालिकेत पंजाब किंग्ज चार गुणांसह दुसऱ्या स्थानावर पोहोचला आहे, तर लखनौ दोन गुणांसह सहाव्या स्थानावर आहे.

---------------------------------------------

कृती आराखडा

राज्य शासनाच्या शंभर दिवसांच्या कृती आराखड्याची प्रभावी अंमलबजावणी सुरू असल्याचं मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सांगितलं. मुख्यमंत्री फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली आज सह्याद्री अतिथीगृहात १०० दिवसांच्या विभाग निहाय कृती आराखड्याचा आढावा घेण्यात आला. यावेळी २६ विभागाचे मंत्री आणि सचिव या बैठकीला उपस्थित होते. शंभर दिवसांच्या आरखड्यात ९३८ कृतीबिंदूवर काम करण्याचे निश्चित करण्यात आले होते. त्यानुसार ४११ कामे पूर्ण झाली असून ३७२ कामे अंतिम टप्प्यात आहेत. तर, केवळ १५५ कामे अर्थात १६ टक्के मुद्दयांवर काम बाकी आहेत. त्यासाठी विभागांना १५ दिवसांचा अवधी वाढवून देण्यात आला असून १ मे पर्यंत ही सर्व कामे पूर्ण होतील असा विश्वासही मुख्यमंत्री फडणवीस यांनी व्यक्त केला. आज २६ विभागांचा आढावा घेतला असून उद्या २२ विभागांचा आढाचा घेणार असल्याचेही मुख्यमंत्र्यांनी सांगितले.

---------------------------------------------